# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/07/2023 (मंगळवार) दुपार


---

### चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील भुगाव सेलु वडोदा नान्हा मांगली ता. कामठी जि. नागपुर येथे दिनांक ०८/०७/२०२३ चे २३.०० वा. दिनांक ०९/०७/२०२३ दरम्यान १) मौजा भुगाव शिवार २ नंबर १०० केव्हीए (२) मौदा सेलु १ नंबर १०० केव्हीए (३) नान्हा मांगली शिवार १ नंबर १०० केव्हीए (४) रानमांगली शिवार १ नंबर १०० केव्हीए (५) आर आर इंडस्ट्रीज पार्क २ नंबर २०० केव्हीए (६) मौजा वडोदा भक्ती मेटल १ नंबर १०० केव्हीए दि. ०९.०७.२०२३ रोजी मुख्यालयातील तंतत्र फयुज कॉल करण्यासाठी गेले असता सदर विदयुत ट्रान्सपोर्ट मधील ऑइल किंमती अंदाजे १६८० लीटर किंमती अंदाजे १,५९,६००/—रू. मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शेषराव निलकंठ तितरामारे, रा. वडोदा ता. कामठी जि. नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सोनेकर पोस्टे मौदा मो. नं. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा हुडपा येथे दिनांक ०९/०७/२०२३ चे १९.०० वा. ते दिनांक १०/०७/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रामानजीयेलु चन्नायेलमंडा गोटीपाटी, वय ५२ वर्ष रा. येलनंदा वेमारामन ता. बळीकुर्वा जि. बापटला आंध्रप्रदेश ह. मु. साळवा ता. कुही हा अग्रवाल रा. नागपुर यांची २० एकर शेती ३ लाख रू. मध्ये ठेक्याने करीत होता. त्या जागेवर फिर्यादी याने आपले ट्रॅक्टर क्र. ए.पी.— ३९ एस. यु.— ०५८० व ट्राली क्र. ए.पी.— ३९ एस.यु— ०८२२ अंदाजे किंमती ५,००,०००/— रुपयाचा मुद्देमाल फिर्यादी याने शेतात खाली जागेत ठेवलेला कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक रोशन नारनवरे ब. नं. ९७७ पोस्टे कुही मो नं. ७८७५१६१४३५ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. मौदा :–** दिनांक ०९/०७/२०२३ चे १६.३० वा. ते १९.०० वा. चे सुमारास पो.स्टे. मौदा हद्दीत फिर्यादी वय १५ वर्ष रा. चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ह. मु. दहेगाव भोवरी ता. मौदा जि. नागपुर ही घरी हजर होती वडील हे कामानिमीत्य बाहेरगावी गेले होते ते संध्याकाळी ०९.०७.२०२३ घरी परत आले त्यांनी पत्नीला विचारले की मुलगी कोठे गेली तीने सांगीतले की मी मुलीला ०४.३० वा. दरम्यान बघीतले होते त्यानंतर ती मला दिसली नाही. गावात नातेवाइकात मुलीचा शोध घेतला मुलगी मिळून न आल्याने मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार चांदेवार मो. नं. ९७६५२२१११६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**